Vikas
जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव.
Jalgaon Jilha Sahakari Dudh Utpadak Sangh Maryadit,Jalgaon.

## दूध वाहतूक रुटचे टेंडर फार्म भरण्यासाठी नियम व अटी

1. टेंडर मध्ये दर मागणी अंकी व अक्षरी लिहावे.
2. दर मागणी व टेंडर तपशिलामध्ये खाडाखोड नसावी चूकून खाडाखोड झाल्यास जवळच दूसऱ्या ठिकाणी सुवाच्य अक्षरात नोंद करुन सही करावी .
3. टेंडर फॉर्मवर अनामत रक्कम भरलेल्या पावतीचा नंबर व तारीख लिहावी.
4. पॅन कार्ड / आधार कार्ड ची छायांकीत प्रत असल्याशिवाय टेंडर फॉर्म मिळणार नाही.
5. दूध वाहतूकीच्या टेंडर दरपत्रक फार्मची विक्री किंमत रु.1000/- + 18टक्के जीएसटी रु.180 असे एकूण रु.1180/- इतकी बिना परतीची राहील.
6. **दूध वाहतूक वाहनांना GPS व सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे बंधनकारक राहील.**
7. **निविदा उघडण्याच्या दिवशी टेंडर धारकाने वाहनाचे आरसी बुक, वाहनाची पॉलीसी व पीयुसी यांची सत्यप्रत आणावी. सदरील प्रत पडताळणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल.**
8. स्वतःच्या मालकीचे वाहन असल्यासच टेंडर भरावे. भाडयाचे वाहन असल्यास चर्चे दरम्यान तसा करारनामा करुन देणे आवश्यक राहील.
9. वाहन मालकाने दरपत्रक भरतांना एक रुटसाठी स्वतंत्र असे अ. वाहनाच्या तांत्रिक बाबी (टेक्नीकल डिटेल्स) ब. वाहनासाठीचे दरपत्रक (कमर्शिअल डिटेल्स) टेंडर उघडतांना प्रथम वाहनाच्या तांत्रिक बाबी संबंधातील पाकीट उघडले जाईल. वाहनधारक वाहनाबाबत संपूर्ण तांत्रिक बाबी (टेक्नीकल डिटेल्स) देण्यास असमर्थ ठरल्यास/ किंवा अपूर्तता असल्यास दुसरे पाकीट न उघडता सदर टेंडर धारकास बाद ठरविण्यात येईल.
10. प्रत्येक रुटसाठी वाहन मालकाने स्वतंत्र दरपत्रक भरणे आवश्यक असून, दोन रुटचे एकत्रित दरपत्रक सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.
11. वाहन मालकाने टेंडर सादर करतेवेळी वाहनाच्या तांत्रिक बाबी संबंधातील पाकीट सादर करतांना त्यासोबत वाहनाचे सर्व कागदपत्रांची झेरॉक्स उदा. आर.सी.बुक, टॅक्स बुक, अन्न सुरक्षा मानके कायद्यांतर्गत घेतलेले नोंदणी प्रमाणपत्र, कमीत कमी third party liability insurance policy असणे बंधनकारक राहील. पी.यु.सी. दाखला आणी फिटनेस सर्टिफीकेट सादर करणे आवश्यक असून, सदर कागदपत्रके सादर न केल्यास टेंडर धारकास बाद ठरविण्याचा अधिकार संघास आहे/ राहील.
12. संघाचे आज रोजी कार्यरत कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांना ठेका दिला जाणार नाही. तसेच यापुर्वी दूध चोरी, गैरवर्तणूक, तक्रार असलेल्या ठेकेदार यांना तसेच नाव बदलून किंवा वाहन बदलून आलेल्या ठेकेदारास ठेका दिला जाणार नाही. तसेच इतर कामकाजानिमित्त ठेका सोडल्यास ठेका दिला जाणार नाही. एखाद्या वेळेस अशाप्रकारे ठेका दिला गेल्यास व नंतर निदर्शनास आल्यास सदरील ठेका रद्द करण्यात येवून सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.
13. टेंडर कालावधीत म्हणजेच दिनांक 01/09/2025 पासून झालेली डिझेल दरवाढ/ दर कपात संघ नियमाप्रमाणे सरासरी तत्वावर ग्राह्य धरण्यात येईल.
14. वाहनधारकाने टेंडरमध्ये दरपत्रक (कमर्शियल डिटेल्स) सादर करतांना सर्व टॅक्सचा समावेश करुन दरपत्रक सादर करावे. (उदा. टोल टॅक्स, स्थानिक स्वराज्य संस्थेत मार्फत वसूल करण्यात येणारा कर, महानगरपालिका टॅक्स, मार्गस्थ टॅक्स इ.)
15. ज्या कामाकरीता किंवा रुटसाठी वाहन भाडयाने लावावयाचे आहे त्या गावाचा, रुट क्रमांकाचा स्पष्टपणे उल्लेख पाकीटावर करुन दरपत्रक भरणाऱ्याचे नांव व मोबाईल क्रमांक नमुद करावे.

16. टेंडर दर निश्चीत करण्यासाठी टेंडर धारकाने स्वतः निर्धारित तारीखेस, वेळेवर व ठिकाणावर चर्चेसाठी उपस्थित रहावे स्वतःला उपस्थित राहता येत नसल्यास आपल्या मार्फत आपला प्रतिनिधी म्हणून ज्यांना पाठविण्यांत येईल त्यांच्याकडे चर्चा व सही करण्यासाठी आपले अधिकार पत्र देणे आवश्यक आहे. संघाचे कायम अथवा कंत्राटी कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांना कोणताही ठेका दिला जाणार नाही.

17. एखाद्या मार्गाचे टेंडर भरल्यानंतर कमीत कमी दर दिल्याचे आढळून आल्यास व नंतर चर्चेच्या वेळी सदर वाहतूक मार्ग चालविण्यास नकार दिल्यास सदर मार्गासाठी भरलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.

18. ठेका मंजूर झल्यानंतर लगेच दूध वाहतूकीचे काम सुरु होण्यापूर्वी तेसच तीन महिन्याच्या आत ठेका ट्रान्सफर केल्यास ठेका अनामत रक्कम जप्त केली जाईल.

19. दूध वाहतूकीचा ठेका मंजूर झाल्यानंतर आदेशात नमूद केलेल्या तारखेच्या आंत ठेका डिपॉझीट रक्कम भरावी लागेल . सदर डिपॉझीटवर व्याज दिले जाणार नाही. ट्रक / मिनिट्रक या वाहनांसाठी ₹ 40,000/- पिकअप वाहनासाठी ₹ 35,000/-, मिनीडोर/ छोटा हत्ती वाहनांसाठी ₹ 30,000/-, ॲपे रिक्षा/ पॅजो रिक्षासाठी ₹ 15,000/- मात्र डिपॉझीट राहील.

20. टेंडर मंजूर झाल्यानंतर दिलेल्या मुदतीत डिपॉझीट रक्कम न भरल्यास, वाहन पुरविण्यास टाळाटाळ केल्यास, टेंडर मंजूर आदेश न स्विकारल्यास दूध वाहतुकीचा ठेका घ्यावायाचा नाही, असे गृहीत धरुन टेंडर अनामत जप्त केली जाईल.

21. संस्था किंवा कंपनी यांच्या नावाने वाहन असेल तर त्या वाहनाच्या ठेक्याबाबत ज्या व्यक्तीस/ भागीदारास अधिकार दिले असतील अशा व्यक्तीच्या नावाने संस्थेला / कंपनीला अधिकार पत्र द्यावे लागेल.

22. आदेशात नमूद केल्याप्रमाणे दूध पाहेच करण्याचा ठेका असला तरी आवश्यकते प्रमाणे संघाच्या सूचनेनुसार त्या संस्थाची दूध वाहतूक करावी लागेल तसेच संघाच्या सोईनुसार मुख्य मार्गास श।टल रुट जोडला गेल्यास त्याची क्रॉसींग करुन दूध वाहतूक करणे ठेकोरास बंधनकारक राहील.

23. दूध वाहतूकीसाठी असलले नियम व अटीचा करारनामा ठेक्याच्या कालावधी पर्यंत बंधनकारक राहील. तसा रु.100/- च्या स्टॅम्पवर ठेकेदारास करारनामा करुन द्यावा लागेल.

24. दूध वाहतूकीसाठी असलेल्या वाहनावर दूध संघाच्या उत्पादनांची/ कार्यकमांची संघाच्या आवश्यकते प्रमाणे जाहीरात (पेंटींग ) रंगवून घ्यावी लागेल व सदरची जाहीरात ठेक्याच्या कालावधीसाठी वाहनावर ठेवावी लागेल.यासाठी वाहन ठेकेदारास कुठल्याही प्रकारचा मोबदला दिला जाणार नाही .

25. टेंडर अनामत रक्कम जमा पावती सादर केल्यानंतर ज्या नावाने भरलेली असेल त्याच नावाने पुडील दोन महिन्यात संघातर्फे चेकने परत करण्यात येईल .

26. दरपत्रकांत टोल टॅक्स व इतर सर्व करांचा समावेश करुन दरपत्रक भरावे. टेंडर मिळाल्यानंतर सुरु झालेले नविन टोल टॅक्स अदा केले जातील

27. वाहनाचा यापुर्वी कुठलाही अपघात झालेला नसावा तसेच दुध संकलनाचे वाहन हे **जानेवारी 2017** पुर्वीचे नसावे. सुस्थितीत असावे.

28. संघाचे व्यवस्थापक (गुणवत्ता व नियंत्रण) यांच्याकडून दूध वाहतूक करणाऱ्या वाहनांची आय.एस.ओ. नियमाप्रमाणे दर तिमाही तपासणी करण्यात येईल. तसेच त्यांनी केलेल्या सूचनांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत वाहतूक ठेकेदाराची राहील. नियमाप्रमाणे सूचनांचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा अथवा दूध वाहतूक वाहन बंद करण्याचा अधिकार संघास राहील.

29. अन्नसुरक्षा मानके कायदा 2006 अंतर्गत दूध वाहतूक वाहनाची नोंदणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक ठेकेदाराची राहील. अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी संबंधित दूध वाहतूक वाहनाची तपासणी केली

असता सदर परवाना सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी दूध वाहतूक ठेकेदाराची असून सादर न केल्यास अन्नसुरक्षा विभागातर्फे होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस दूध वाहतूक ठेकेदार सर्वस्वी जबाबदार राहील.

30. दूध वाहतूक वाहनावरील काम करणारे वाहक व क्लिनर यांचे वय 18 वर्षे वरील असणे आवश्यक असून ते कामकाजात प्रामाणिक, निरव्यसनी व कायम स्वरुपी न बदलणारे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेवर कुठलाही फौजदारी गुन्हा दाखल नसावा. त्यांची वर्तणूक असभ्य असल्यास किंवा ते मद्यपान केल्याचे आढळल्यास त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची व त्यांना संघाच्या आवारात प्रवेश न देण्याचा अधिकार संघास राहील.

31. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर त्वरीत खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

I. ठेकेदाराच्या नावाचे आधारकार्ड - झेरॉक्स प्रत.
II. ठेकेदाराच्या नावाचे पॅनकार्ड - झेरॉक्स प्रत.
III. वाहनाचे पि.यु.सी. सर्टिफिकेट - झेरॉक्स प्रत
IV. वाहनावरील चालक व क्लिनर यांना कोणत्याही प्रकारचा संसर्गजन्य आजार नसावा, दूग्ध उद्योगात कामकाज करण्यास पात्र असल्याची वैद्यकिय तपासणी करुन सर्टिफिकेट देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी येणारा खर्च स्वतः ठेकेदारास करावा लागेल.
V. चालक यांचे ड्रायव्हींग लायसन्सची छायाप्रत
VI. वाहनावर हुड/ ताडपत्री बांधणे बंधनकारक आहे.
VII. वाहनाचे मालकी हक्काचे कागदपत्र उदा. आर.सी.बुक, मोटर पॉलीसी, कॉम्प्रहेन्सीव्ह विमा इत्यादी.
VIII. वाहन मालक यांचा पूर्ण पत्त, संपर्क क्रमांकासह
IX. अन्न सुरक्षा कायदा 2006 चे अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत

22. वाहनावर जे चालक / वाहक काम करीत असतील त्यांच्याकडे भ्रमण दूरध्वनी असणे आवश्यक राहील. ही जबाबदारी ठेकेदाराची राहील व सदरचे नंबर या कार्यालयाकडे कळविण्यात यावे.

23 आर.टी.ओ. नियमानुसार आपल्या वाहनाच्या कमाल क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक करु नये. त्या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील.

24 निविदा स्विकारणे व नाकरण्याचा अधिकार संघाने राखुन ठेवलेला आहे. वरील नियम व अटीस अधीन राहून टेंडर फार्म भरुन तो सिलबंद पाकीटात टाकून पाकीटावर दूध वाहतूक रुट नंबर, स्वतःचे नाव व पत्ता लिहून मोहरबंद टेंडर कार्यकारी संचालक यांच्या नावाने संघाच्या प्रशासन विभागात द्यावे. पोष्टाने टेंडर पाठवू नये. कोणतेही अथवा सर्व टेंडर्स काहीही कारण न देता स्वीकारण्याचा / नाकारण्याचा हक्क संघाने राखुन ठेवला आहे.

**कार्यकारी संचालक**
**जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक**
**संघ मर्यादित, जळगांव**

D;/Tender Notic-22-23-4